# उपवनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनविभाग, नागपूर यांचे कार्यालय

(बि.एस.एन.एल. लक्ष्मी संचार इमारत, कस्तुरचंद पार्क समोर, नागपूर 440 001.)
(Land Line No - 0712-2564569, Email-id : dycftnagpur@mahaforest.gov.in)

क्र.कक्ष-11/वनसंवर्धन/प्र.क्र.502/2022-23/ 3108 दिनांक 09/01/2023

**विषय**:- Proposal for diversion of 0.34ha. forest land for rehabilitation and up gradation of Nagpur - Katol-Warud National Highway (NH-353J) from existing KM 60+100 (End of Katol bypass) to 101+085 (Warud up to Joint Junction) to two lane with paved shoulders in the Maharashtra on EPC Mode.

प्रति,
कार्यकारी अभियंता,
राष्ट्रीय महामार्ग विभाग,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
बंगला क्र 39/1, सिव्हील लाईन,
नागपूर.

संदर्भ:- 1) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांचे पत्र क्र कक्ष-10/जमीन/प्र.क्र.1136/1231, दिनांक 10/11/2022.
2) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचे पत्र क्र कक्ष-17/नोडल/आय.डी. 13757/2064, दिनांक 18/11/2022.
3) आपलेकडील पत्र क्रमांक 35/ता/पीओ-I/2023,दिनांक 04/01/2023.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र 1 अन्वये वनसंवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत Proposal for diversion of 0.34ha. forest land for rehabilitation and up gradation of Nagpur- Katol-Warud National Highway (NH-353J) from existing KM 60+100 (End of Katol bupass) to 101+085 (Warud up to Joint Junction) to two lane with paved shoulders in the Maharashtra on EPC Mode चा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडे सादर करण्यात आला असता अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडील संदर्भिय पत्र क्र 2 अन्वये 1 ते 10 त्रुटी उपस्थित केलेल्या होत्या. त्याअनुषंगाने संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वयेआपणाकडून सदर प्रस्तावामधील मोघम स्वरूपात त्रुटयांची पूर्तता करुन पूर्तता अहवाल परस्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म.रा. नागपूर यांना सादर करण्यात आलेला आहे व प्रत या कार्यालयास पृष्ठांकित करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, पूर्तता अहवाल हा प्रस्तावामध्ये संलग्नीत करुन परिपूर्ण प्रस्ताव योग्य मार्गाने म्हणजेच उपवनसंरक्षक, नागपूर यांचे कार्यालयामार्फत वरिष्ठ कार्यालयास सादर करणे अभिप्रेत आहे. तसेच आपण सादर केलेला पूर्तता अहवाल अपूर्ण व मोघम स्वरूपाचा आहे. करिता सदर प्रकरणी स्वत: जातीने लक्ष देवुन खालील प्रत्येक मुद्याची पूर्तता करुन प्रस्तावाच्या प्रतिमध्ये प्रत्येक पूर्तता केलेला दस्ताऐवज संलग्न करुन प्रस्तावाच्या प्रति या कार्यालयास सादर कराव्यात, जेणेकरुन सदर प्रकरणी कार्यवाही करणे सोईचे होईल.

1. Forest & Non Forest चे Area Statement वेगळयाने प्रस्तावासोबत आपले स्वाक्षरीनीशी प्रस्तावासोबत सलंग्न करावेत, जेणेकरुन उपवनसंरक्षक त्यावर स्वाक्षरी करुन सदर प्रमाणपत्र वरिष्ठ कार्यालयास सादर करतील.

2. प्रस्तावित क्षेत्र हे वन्यजीव अभयारण्यापासुन अंतरावर नमुद असल्याचे नमुद केलेले आहे. त्याअनूसार टोपोशिट वर ठळक रंगाने सदर बाब दर्शवुन प्रस्तावात संलग्न करावी.

3. आपणाकडून Geo Reference Map, Index Map प्रस्तावासोबत जोडलेला नाही. त्यावर वनक्षेत्र व वनेत्तर क्षेत्र वेगवेगळया रंगाने दर्शवुन नकाशावर कक्ष क्रमांक स्पष्टपणे नमुद करुन प्रस्तावात संलग्न करावीत.

4. प्रस्तावातील क्षेत्रातील भारसिंगी, सर्व्हे क्र. 26 हे महसुल विभागाचे ताब्यात असल्याने त्याबाबतची सद्यास्थिती या कार्यालयास कळविण्यात यावी.

5. प्रस्तावीत क्षेत्राचे केएमएल फाईल्समध्ये Properties, Starting Point & Ending Point नमुद करुन सर्व्हे क्रमांक, गाव व कक्ष निहाय वनाची सिमा दर्शवुन केएम फाईल्स पेनड्राईव्ह मध्ये या कार्यालयास सादर करावी.

6. पर्यायीवनीकरणाची केएमफाईल, गुगल सॅटेलाईट इमेजसह पेनड्राईव्ह मध्ये या कार्यालयास सादर करावी.

7. मौजा चाकडोह गावाचा नकाशा व 7/12 उतारा या कार्यालयास सादर करावा. सादर केलेल्या नकाश्यात सर्व्हे क्र. 10 एकुण आराजी 2.06 हे. मध्ये 1.00 हे. क्षेत्र दर्शवुन नकाशा प्रस्तावासोबत संलग्न कराव्यात:

उपरोक्त मुद्यांची पूर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव 5 प्रतित या कार्यालयास सादर कराव्यात.

(डॉ. भारत सिंह हाडा)
**उपवनसंरक्षक (प्रा),**
**नागपूर वनविभाग, नागपूर**

O/c

प्रतिलिपी:- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
प्रतिलिपी:- मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

प्रस्तावाच्या 3 प्रतिसह.